# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०७/१०/२०१६

**१) विवाहीतेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी १८.०० ते १८.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी समोरील हॉल मध्ये एकटीच टिव्ही पाहत असतांनी यातील आरोपी हा फिर्यादीच्या घरात आत प्रवेश करुन फिर्यादीचा डावा हात पकडुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५२,३५४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) महीलेला अश्लिल शब्दात शिविगाळ करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी १५.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आरोपीचे घराच्या कोप—यावर सार्वजनिक ठिकाणी हात ठेल्यावर कपडे विक्रीचे काम करीत असता यातील आरोपीने फिर्यादीच्या दुकाना समोर आपली मोटार सायकल लावुन फिर्यादीच्या हाताला, छातीला धक्का देवुन कुर्ती ओढुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन 'तिच्या परीवातील महीलांवर बलत्कार करीन' अशी धमकी देवुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,२९४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी ११.००ते १४.०० वा. दर. यातील फिर्यादी सागर राजकुमार शादीजा वय २४ वर्ष, रा. सिंधी कॉलोनी भंडारा यांनी आपली हिरो होंडा स्प्लेन्डर काळया रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ बी ५६५५ कि. १३,०००/—रु. निंबाबाई मंदीर जवळ ठेवुन ऑप्टीकल दुकानात काम करीत असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. वरठी, सिहोरा, साकोली व अडयाळ येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारु कि. ३,५००/—रु. व ७५० मिली देशी दारु कि. २००/—रु. तसेच जुगारातुन कि. १,५७,५०३/—रू. चा असा एकुण कि. १,६१,२०३/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.